१) विचारविमर्ष समितीची पहिली बैठक - (पुणे) दि. २५/१०/२०१२.
२) संचालनालयामध्ये दुसरी बैठक- दि. १३/१२/२०१२.
३) विचार विमर्ष समितीचा प्रस्ताव जा.क्र.६२,दि. २२/०१/२०१३

---

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य,कोकणभवन, ६ वा माळा,**
**नवी मुंबई ४०० ६१४**
**दिनांकः-** 14 FEB 2013

## कार्यालयीन आदेश क्र.०३

विषय :- <u>विचारविमर्ष समितीच्या शिफारशीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण करताना विचारात घ्यावयाच्या बाबींबाबत.</u>

संचालनालयाचे पत्र क्र. स्था.१८/ब/परिपत्रक/सलेपअ/अहवाल/१२६२, दि. ३१/०७/२०१२ अनुसार लेखापरीक्षणाच्या कामकाजात दर्जात्मक सुधारणा होण्याकरिता विचारविमर्ष समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने केलेल्या शिफारशीनुसार लेखापरीक्षणाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याकरिता आदेशित करण्यात येत आहे.

**१) अर्धसमास पत्राचा संदर्भ आक्षेपामध्ये समाविष्ट करणेबाबत :-**

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा नियम १९३१ मधील नियम क्र. १७ व १८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक तेथे अर्धसमास पत्राचा उल्लेख लेखापरीक्षा अहवालातील आक्षेपामध्ये करण्यात यावा. ज्या संस्थांचे लेखापरीक्षण करण्यात येते अशा संस्थांना वेळोवेळी आणि आवश्यकतेनुसार अर्धसमास पत्रे निर्गमित करुन लेखापरीक्षणासाठी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी आणि लेखापरीक्षक यांनी लेखापरीक्षणादरम्यान उपस्थित केलेल्या मुद्यांचा खुलासा करण्यासाठी संबंधित संस्थेस संधी उपलब्ध करुन देण्यासाठी अर्धसमास पत्रे निर्गमित करणे अनिवार्य आहे. संचालनालयामार्फत तयार करण्यात येत असलेल्या (Audit Information Monitoring System) आज्ञावलीमध्येसुध्दा ही अर्धसमासपत्रे Up-load करणे अनिवार्य राहील.

**२) लेखापरीक्षण अहवालासोबत नियम क्र. ७०७ नुसार प्रमाणपत्र जोडणेबाबत :-**

मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य कार्यालयीन नियमपुस्तिका नियम क्र. ७०७ नुसार लेखापरीक्षण अहवालासोबत विहित नमुन्यातील प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तसेच सर्व लेखापरीक्षकांच्या ७०७ वर त्यांचे नावांसमोर सह्या घेण्यात याव्यात.

तसेच पंचायती राज समितीच्या लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाकरिता प्रस्तावित करावयाच्या परिच्छेदांची निवड ही मूळ लेखापरीक्षण अहवालासोबत करु नये. मूळ लेखापरीक्षण अहवाल निर्गमित केल्यानंतर जिल्हा परिषदांना दिलेल्या प्रथम पूर्तता अहवालाच्या ४ महिन्यांच्या मुदतीनंतर प्राप्त अनुपालने तपासावी. तपासणी अंती एक महिन्याच्या आत संचालनालयाच्या पं.रा.स. शाखेकडे प्रस्तावित परिच्छेदांची शिफारस सह संचालक कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे करण्यात यावी.

**३) अभिलेखे तपासणे :-**

जिल्हा स्तरावरुन निर्गमित होणाऱ्या लेखापरीक्षण अहवालामध्ये लेखापरीक्षण पथकास अभिलेखे उपलब्ध न करुन दिल्याबाबतचे आक्षेप नोंदविले जातात. अशा आक्षेपांच्या संदर्भात अहवाल निर्गमित झाल्यानंतर संबंधित कार्यालये अभिलेखे उपलब्ध झाल्याचे कळवून ते तपासण्याची विनंती करतात. अशावेळी असे अभिलेखे जिल्हा कार्यालयाने तपासावित व तपासणीअंती नव्याने उपस्थित आक्षेप चालू लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट करावेत.